महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे

# जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १६ ऑक्टोबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : ११३ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

# जिल्ह्यातील सर्व शाळा स्मार्ट होणार !

## १०० कोटींचा आराखडा तयार करा - खा. श्रीकांत शिंदे यांचे निर्देश

**"ग्रामीण भागाच्या विकासासाठी दिशा समिती काम करत असते आणि यासाठी दिशा समितीमार्फत नियंत्रण असणे गरजेचे आहे. जल जीवन मिशन योजना, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण विभागातील कामकाज वेगाने होण्यासाठी पाठपुरावा करून कामकाज सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळ्या मामा- सुरेश गोपीनाथ म्हात्रे यांनी केले.**




दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**दि. १५ :** जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समितीचे अध्यक्ष तथा खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे अध्यक्षतेखाली आज, दि. १५ ऑक्टोबर, २०२५ रोजी नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे बैठक संपन्न झाली. जिल्हा प्रशासनाच्या समन्वयाने जिल्ह्याचा विकास करण्यासाठी दिशा समिती बैठक आयोजित करण्यात आली असून योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी ही बैठक महत्त्वाची आहे. केंद्र सरकारच्या अंतर्गत राबविणाऱ्या योजना विविध विभागांना दर्जेदार पायाभूत सुविधांची कामे सुनिश्चित करून आणि योजना त्यांच्या इच्छित लाभार्थ्यांपर्यंत पोहोचतील याची खात्री करण्याचे आवाहन खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांनी यावेळी केले.

तसेच प्रधानमंत्री आवास योजना संदर्भात कामकाज करताना येणाऱ्या अडचणींवर मात करण्यासाठी प्रशासनाने लोकप्रतिनिधीं चर्चा करणे आणि योग्य मार्ग काढण्यासाठी प्रयत्नशील रहावे, तसेच जिल्ह्यातील सर्व शाळा 'स्मार्ट शाळा' करण्यासाठी १०० कोटी निधी आराखडा तयार करून कार्यवाही करण्याबाबत सूचना दिल्या. जिल्ह्यातील स्मार्ट आरोग्य केंद्र तयार करण्यासाठी प्रशासनाने पुढाकार घ्यावा.

यावेळी इ-वेस्ट मॅनेजमेंट करण्यासाठी ठाणे जिल्ह्यातील सर्व प्रशासकीय यंत्रणेने पुढाकार घ्यावा. मलंगगड, भिवंडी-निजामपूर महानगरपालिका तसेच इतर ठाणे जिल्हयातील इतर ठिकाणी घनकचरा व्यवस्थापन पान ३ वर ▶▶▶

# भिवंडीतील आदिवासी क्षेत्रात उपजिल्हा रुग्णालयाची मागणी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी/प्रतिनिधी :** भिवंडी तालुक्यातील कांबा ते चिंबीपाडा या दरम्यानं चिंबीपाडा गांव येथे असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर उपजिल्हा रुग्णालयात करण्यात यावे अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व आरपीआय सेक्युलर पक्ष यांच्यावतीने करण्यात आली. सामाजिक कार्यकर्ते अजिंक्य गायकवाड यांनी पक्षाच्यावतीने राज्य शासन व भिवंडीत उपविभागीय अधिकारी कार्यालयात निवेदन सुध्दा सादर केले आहे.याबाबत लवकर खासदार सुरेश (बाळामामा) म्हात्रे यांना भेटणार असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

भिवंडी तालुक्यातील पारोळ रोड या दुर्गम व विस्तृत अशा आदिवासी रहिवासी भागातील कांबे गाव ते पारोळ रोड जिथे भिवंडीची हद्द समाप्त होऊन वसई तालुक्यास सुरुवात होते तिथपर्यंत असलेली अनेक गावे,शिवाय डोंगराळ भागात असणारे अनेक पाडे येथे सुमारे ५० हजाराहून अधिक लोकसंख्या आहे. या भागातील सर्वच ग्रामपंचायती या आदिवासी बहुल असल्याने पेसा अंतर्गत त्यांचा समावेश आहे. त्यामुळे अनेक गोरगरीब नागरिक आदिवासी लोक येथे वास्तव्य करतात.परंतु या संपूर्ण विस्तृत भागा मध्ये खाजगी रुग्णालय नाही,प्राथमिक आरोग्य केंद्र चिंबीपाडा हा एकमेव पर्याय येथील नागरिकांना आहे,परंतु येथील नागरिकांना उपचारासाठी भिवंडी येथील खाजगी किंवा स्व.इंदिरा गांधी उपजिल्हा रूग्णालयात पोहचण्यासाठी खराब रस्ता व वाहतूक कोंडी मुळे सुमारे एक तासाहून अधिक काळ लागतो.अनेक वेळा इंदिरा गांधी रूग्णालयात उपचार योग्य न मिळाल्याने रूग्ण दगावतात त्यामुळे ग्रामीण भागासाठी तात्काळ उपजिल्हा रुग्णालय निर्माण करावे अशी अपेक्षा गायकवाड व ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

ग्रामीण भागातील लोकसंख्येचा विचार करीता प्राथमिक आरोग्य केंद्रातील रुग्णसेवा अपुरी पडत असल्याने येथे उपजिल्हा रुग्णालयाची आवश्यकता आहे अशी मागणी अजिंक्य गायकवाड यांनी केली आहे. विशेष करून गरोदर महिलांसाठी उपचारासाठी करावा लागणारा प्रवास जीवघेणा झाला आहे.सर्पदंश झालेले रुग्ण सुद्धा मोठ्या प्रमाणात या भागात आढळतात. शिवाय सर्वात महत्त्वाचे म्हणजे पावसाळ्याच्या दिवसात पूरस्थितीत कांबे गावा जवळील रस्ता हा संपूर्णपणे पाण्या खाली जातो, अशावेळी भिवंडी शहराकडे जाण्याचा पर्यायी रस्ता उपलब्ध नसतो, त्यामुळे मोठी अडचण निर्माण होऊन अशा परिस्थितीत शासनाने मागणीचा गांभीर्याने विचार करावा अशी मागणी अँड किरण चन्ने यांनी सुध्दा केली आहे. चिंबीपाडा येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे रूपांतर ग्रामीण रुग्णालयात करावे,वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन भिवंडी ग्रामीण भागा साठी स्वतंत्र आरोग्य यंत्रणा उभी करावी, रुग्णवाहिका सेवा या भागात शासनाने सदैव उपलब्ध करून द्यावी,तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र व उपकेंद्रांचा दर्जा सुधारावा अशा मागण्यांचे निवेदनही उपविभागीय अधिकारी अमित सानप यांना सुपूर्द करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

# विरोधकांचे एक मत फुटले ?

## खर्डीच्या उपसरपंचपदी प्रशांत खर्डीकर



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ता.15 (वार्ताहर)**

खर्डी ग्रापच्या उपसरपंच निवडणुकीत ग्रामसन्मान प्यानल कडून दिनेश सदगीर,पूजा परदेशी व ग्रामविकास व संघर्ष प्यानलकडून प्रशांत खर्डीकर यांनी उमेदवारी अर्ज भरले होते.दिनेश सदगीर यांनी उमेदवारी अर्ज मागे घेतल्याने प्रशांत खर्डीकर व पूजा परदेशी यांच्यात लढत झाली.ग्राप सदस्य सांख्य 13 होती त्यात प्रशांत खर्डीकर यानान 7 तर पूजा परदेशी याना 6 मते मिळाल्याने प्रशांत खर्डीकर ह्यांची उपसरपंच पदी निवड झाली असल्याचे सरपंच मंगला गावित यांनी नाहीत केले.ग्रामसन्मान प्यांनलचे एक मत फुटल्याने प्रशांत खर्डीकर विजयी झाले. खर्डी ग्रापचे उपसरपंच मौसीम शेख यांना कोकण विभाग विभागीय आयुक्त डॉ.विजयकुमार सूर्यवंशी यांनी अधिकाराचा व पदाचा दुरुपयोग केल्याप्रकरणी मौसीम शेख यांना उपसरपंच व सदस्यपदातून 24 सप्टेंबरला पदमुक्त केले होते. त्यामुळे उपसरपंच पद रिक्त झाल्याने ही निवडणूक 15 ऑक्टो रोजी ग्राप सभागृहात झाली. ग्रामसन्मान प्यानलचे सरपंच सहित 7 व ग्रामविकास व संघर्ष प्यानल युतीचे 6 सदस्य होते.या निवडणुकीत सन्मान प्यांनलचे एक मत फुटल्याने ग्रामविकास प्यांनलचे प्रशांत खर्डीकर विजयी झाले असून एक मत कोणाचे फुटले याबाबत तर्कवितर्क सुरू असून खर्डी त उलटसुलट चर्चेला उधाण आले आहे. यावेळी ग्रामविकास प्यांनलचे सर्वेसर्वा गणेश जाधव,संघर्ष प्यानलचे उपेंद्र पवार,भाजप तालुकाध्यक्ष भास्कर जाधव,उद्योजक व भाजपचे गणेश राऊत,अनिल पातकर,उदय दातीर,प्रशांत जगताप,शाकिर शेख,भरत परदेशी,आशपक अत्तार, हेमंत परदेशी, संजय खर्डीकर,नरेश जाधव,फिरोज शेख व ओंकार सारंगधर यांच्यासह खर्डी परिसरातील मान्यवरांनी उपस्थित राहून प्रशांत खर्डीकर यांचे अभिनंदन केले.

# दिवाळीच्या मुहूर्तावर अंबरनाथ नाट्यगृहाचे लोकार्पण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ**

दिवाळीच्या प्रकाशमय उत्सवात यंदा अंबरनाथ शहरात एक अनमोल सांस्कृतिक दीप प्रज्वलित होणार आहे. संसदरत्न खासदार डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या अथक पाठपुराव्याने आणि पुढाकाराने उभारण्यात आलेल्या अंबरनाथ नाट्यगृहाचे लोकार्पण रविवार, १९ ऑक्टोबर २०२५ रोजी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि ज्येष्ठ अभिनेते अशोक सराफ यांच्या मुख्य उपस्थितीत संपन्न होणार आहे. या ऐतिहासिक क्षणाचा साक्षीदार होण्यासाठी मराठी कलाविश्वातील नामवंत दिग्दर्शक, अभिनेते आणि संगीतकार अंबरनाथ नगरीत उपस्थित राहणार आहेत. अंबरनाथ पश्चिमेतील सर्कस मैदान येथे उभारण्यात आलेल्या या नाट्यगृहाच्या लोकार्पणानिमित्त आठ दिवस सुप्रसिद्ध नाटकांच्या विशेष प्रयोगांचे देखील आयोजन करण्यात आले आहे.

नाट्यगृहाच्या लोकार्पणाच्या दिवशी ज्येष्ठ अभिनेते भरत जाधव यांच्या "सही रे सही" या लोकप्रिय नाटकाच्या प्रयोगाचे आयोजन करण्यात आले आहे. या लोकार्पण सोहळ्याला मराठी रंगभूमी व चित्रपटसृष्टीतील मान्यवर ज्येष्ठ अभिनेते व दिग्दर्शक महेश कोठारे, महेश मांजरेकर, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, ज्येष्ठ अभिनेत्री उषा नाडकर्णी, अभिनेते विजय गोखले, अभिनेत्री अलका कुबल, अभिनेते व दिग्दर्शक विजय पाटकर, अभिनेते मकरंद अनासपुरे हे विशेष अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. सिद्धार्थ जाधव, विशाखा सुभेदार आणि संतोष जुवेकर यांसारखे लोकप्रिय कलाकारही या सोहळ्याची शोभा वाढवतील. मराठी संस्कृती, नाट्यकला आणि संगीत क्षेत्रातील या सर्व मान्यवरांच्या उपस्थितीने अंबरनाथचा हा लोकार्पण सोहळा एक अविस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरणार आहे. खासदार डॉ.श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या पुढाकाराने शहरात आधीच रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण, ग्रंथालये, अभ्यासिका, उद्याने आणि पायाभूत सुविधा उभारल्यानंतर आता या नाट्यगृहाच्या माध्यमातून सांस्कृतिक क्षेत्रातही नवा अध्याय सुरू झाला आहे. या नाट्यगृहामुळे अंबरनाथ आणि परिसरातील रसिकांना कल्याण किंवा डोंबिवली गाठण्याची गरज आता उरणार नाही. अंबरनाथ शहरातच विविध नाटकांची अनुभूती नागरिकांना घेता येणार आहे.







# ई - केवायसीसाठी लाडक्या बहिणींचे " जागरण "

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - लाडकी बहीण योजनेच्या हफ्ते सुरु राहावे यासाठी राज्य शासनाने ई - केवायसी अनिवार्य केल्याने लाभार्थी महिला वर्गाला मोठी कसरत करून आपली पडताळणी प्रक्रिया पूर्ण करावी लागत आहे. संकेतस्थळावर भार असल्याने दिवसा बहुतांश वेळा संकेतस्थळ बंदच असते. मात्र यावर तोडगा काढून आणि पडताळणी पूर्ण करण्यासाठी महिलांनी चक्क मध्य रात्री एक ते तीन वाजण्याच्या सुमारास ई केवायसी प्रक्रिया करण्यास सुरुवात केली आहे. तर काही महिलांनी पहाटे चार ते पाच वाजता उठून ही प्रक्रिया पूर्ण केल्याचे लोकसत्ताशी बोलताना सांगितले. यामुळे संकेतस्थळावरील अडथळे दूर करावी अशी मागणी योजनेच्या लाभार्थी महिलांकडून करण्यात येत आहे. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेतील लाभार्थीना 'ई-केवायसी' बंधनकारक करण्यात आली आहे. त्यासाठी नवीन नियमावली जारी करण्यात आली असून, या नियमानुसार लाभार्थ्यांना 'ई- केवायसी' प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. सुमारे पंधरा दिवसांपूर्वी ही प्रक्रिया सुरु झाली आहे. प्रक्रिया सुरू होताच एकाच वेळी मोठ्या प्रमाणावर नोंदणी सुरू झाल्याने 'ई-केवायसी' संकेतस्थळ ठप्प झाल्याचे उघड झाले होते. लाभार्थ्यांच्या नोंदी करण्यासाठी प्रशासनाकडून प्रयत्न सुरू असल्याचे दोन आठवड्यांपूर्वी स्पष्ट करण्यात आले होते.

लक्षवेधी

## कल्याण तालुक्यातील अतिवृष्टी बाधित शेतकऱ्यांना नुकसानभरपाई

**ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ४० तलाठ्यांसह ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी असे ९० अधिकारी कर्मचारी यांनी अवघ्या १२ दिवसात तालुक्यातील एकूण ३,०६७ शेतकऱ्यांचे पंचनामे केले.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** अतिवृष्टीमुळे कल्याण तालुक्यातील भात शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या पार्श्वभूमीवर महसूल कृषी आणि ग्रामविकास विभागाकडून युद्ध पातळीवर नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे करण्यात आले. दिवाळीपूर्वी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार असल्याची माहिती कल्याणचे तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिली. सप्टेंबर महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कल्याण तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. पावसामुळे भात पिकांची हानी झाल्याने शेतकऱयांच्या हाता तोंडाशी आलेला घास हिरवला गेला. या पार्श्वभूमीवर महसूल, कृषी आणि ग्रामविकास विभागाकडून युद्धपातळीवर नुकसानग्रस्त शेतकऱयांना नुकसानभरपाई देण्यासाठी नुकसान झालेल्या शेतीचे पंचनामे करण्याचे काम सुरू करण्यात आले. ठाणे जिल्हाधिकाऱ्यांच्या सुचनेनुसार तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ४० तलाठ्यांसह ग्रामपंचायत अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी, सहाय्यक कृषी अधिकारी, गट विकास अधिकारी असे ९० अधिकारी कर्मचारी यांनी अवघ्या १२ दिवसात तालुक्यातील एकूण ३,०६७ शेतकऱ्यांचे पंचनामे केले. ८७५ हेक्टर भात पिकांचे नुकसान झाले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे पंचनामे आणि याद्या तयार झाल्या असून शासनाकडे सुपूर्द करण्यात आल्या आहेत. त्यामुळे नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना दिवाळी पूर्वी नुकसान भरपाई मिळणार असल्याचे तहसीलदार सचिन शेजाळ यांनी सांगितले.



## आ. कुमार आयलानी यांच्या हस्ते कोट्यवधीच्या विकास कामांचे भूमिपूजन!

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** कल्याण तालुक्यातील औद्योगिक ग्रामपंचायत म्हणून ओळख असलेल्या कांबा ग्रामपंचायत हद्दीतील वाघेरापाडा या आदिवासी वस्तीतील विविध प्रकारच्या साधारण पणे सुमारे एक कोटी रुपये विकास कामांचे भूमिपूजन कार्यसम्राट आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते नुकतेच झाले. कांबा-वाघेरापाडा येथे स्मशानभूमि, जिल्हा परिषद शाळा तसेच शाळेकडे येणारा रस्ता, गटारे,आदी विविध प्रकारच्या कामाबाबत सातत्याने मागणी होत होती. त्यामुळे उल्हासनगर विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार कुमार आयलानी यांनी म्हारळ, वरप, कांबा गावातील कामासाठी३कोटी रुपयांची तरतूद करून निधी मंजूर करून घेतला होता. त्यापैकी वाघेरापाडा येथील जिप शाळेकडे येणारा रस्ता सिमेंट कॉंक्रीटीकरण करणे, शाळेचे सुशोभीकरण, स्मशानभूमी शेड व इतर सुविधा याचे भूमिपूजन आज आमदार कुमार आयलानी यांच्या हस्ते झाले, यावेळी ते म्हणाले या गावांनी मला चांगली साथ दिली आहे, यामुळे कांबा, यानंतर वरप आणि म्हारळ येथे विविध विकास कामांचे भूमिपूजन करण्यात येणार आहे, शिवाय या म्हारळ, वरप, कांबा गावासाठी शासनाकडे १०कोटी रुपयांची मागणी केली असल्याचे त्यांनी सांगितले. याप्रसंगी ग्रामपंचायतीच्या सरपंच उषा गांवडे,माझी सरपंच भारती भगत, मंगेश बनकरी, उपसरपंच दत्ता भोईर, सदस्य अरुण सुरोशे, अरुण तुर्भेकर, चिंतामन चौधरी, संजय भोईर, मधुकर सुरोशे,ग्रामपंचायत अधिकारी सुंदा पाटील, आमदारांचे स्वीय सहाय्यक श्री सोनार, म्हारळ चे माझी सरपंच योगेश देशमुख व ग्रामस्थ मंडळी उपस्थित होते.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

दैनिक ठाणे
जीवनदीप वार्ता
news.thanejeevandeep@gmail.com


# डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांना केडीएमसीतर्फे अभिवादन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंती दिनी आज महापालिकेतर्फे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. महापालिका मुख्यालयात महापालिका सचिव किशोर शेळके यांनी डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, प्रोग्रामर मीनल भदे,अधीक्षक समाधान मोरे, सहा.माहिती व जनसंपर्क अधिकारी सुमित बोयत तसेच इतर कर्मचारी वर्गाने देखील डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करून अभिवादन केले.

# ठाणे महानगरपालिकेच्या वतीने अब्दुल कलाम यांची जयंती साजरी



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महानगरपालिकेच्या वतीने भारतरत्न माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांची जयंती साजरी करण्यात आली. त्यानिमित्ताने, महापालिका मुख्यालय येथील कै. नरेंद्र बल्लाळ सभागृहात भारतरत्न माजी राष्ट्रपती स्वर्गीय डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी उपायुक्त (मुख्यालय) जी. जी. गोदेपुरे, महिला व बालविकास अधिकारी दयानंद गुंडप, माहिती व जनसंपर्क अधिकारी रवींद्र मांजरेकर यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

# कलाध्यापक संघाचे एक दिवसीय कृतीसत्र संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील)** : शहापूर तालुका कलाध्यापक संघाचे एकदिवसीय कृतीसत्र नुकतेच वासिंद येथील जिंदाल विद्यामंदिर येथे उत्साहात संपन्न झाले या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून प्रशांतजी शर्मा तर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महामंडळाचे राज्य सरचिटणीस दिगंबर बेंडाळे, यांनी भूषविले व्यासपीठावर मुंबई विभागीय उपाध्यक्ष महाराष्ट्र राज्य कलाध्यापक महामंडळाचे विलास सेसाणे, वेरा फिल्म निर्माते व कलाकार मुंबईचे राज मिसाळ माननीय ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाचे उपाध्यक्ष निलेश रोठे ठाणे जिल्हा कलाध्यापक संघाचे सचिव अमोल पाटील , सहसचिव भगत सर, शहापूर तालुका कलाध्यापक संघाचे अध्यक्ष शंभुराज सोनवणे सल्लागार सुधीर थोरात, सुनील काठोळे . शिवदास वाघ पान पाटील व सचिव विलास पडवळ फर्डे सर , प्रसिद्ध चित्रकार सूर्यवंशी सर व पराग ठाकरे,भरत भोईर दिनेश रिकामे तसेच शहापूर तालुक्यातील सर्व कलाकार मान्यवर उपस्थितीत होते.

सदर कार्यक्रमात तालुक्यातील सहा कलाध्यापकांना 'कलासाधक पुरस्काराने देऊन सन्मानित करण्यात आले. त्यात संजय पानपाटील, सुनिल सूर्यवंशी दिनेश भोईर , विलास पडवळ ,मनाली वाघे,छोटीराम सुर्यवंशी, व मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार कै.मिलींद जाधव , तालुक्यातील प्रसिद्ध साईन बोर्ड हे आर्टिस्ट यांना प्रदान करण्यात आला.या कार्यक्रमाचे बहारदार सुत्रसंचलन विदुर चौधरी यांनी केले.सदर कार्यक्रमात प्रसिद्ध चित्रकार अमोल यशवंतराव यांनी निसर्ग चित्रण प्रात्यक्षिक सादर करून कार्यक्रमाची रंगत वाढवली. कार्यक्रम अतिशय आनंदात व उत्साहात संपन्न झाला.

# जागतिक अन्न दिन

दरवर्षी १६ ऑक्टोबर रोजी जागतिक अन्न दिन साजरा केला जातो. हा दिवस उपासमार आणि कुपोषणाच्या आव्हानांना तोंड देण्याची आठवण करून देतो, तसेच सर्वांना अन्न आणि पाण्याची समान उपलब्धता मिळावी यासाठी वकिली करतो. या दिवशी, आपण जागरूकता वाढवली पाहिजे, धोरणात्मक बदलांना आणि समुदायातील बदलांना प्रोत्साहन दिले पाहिजे जेणेकरून एक लवचिक आणि शाश्वत अन्न व्यवस्था निर्माण होईल.

## जागतिक अन्न दिनाची घोषणा

एका वेळी एक जेवण देऊन जगाचे पोषण करा.

वर्तमानाचे पोषण करणे, भविष्याचे पोषण करणे.

अन्न हे जीवन आहे आणि निरोगी अन्न ही एक मूलभूत गरज आहे.

चला, एकत्रितपणे, उपासमारमुक्त भविष्य घडवण्याची प्रतिज्ञा करूया.

निरोगी अन्न निरोगी राष्ट्र निर्माण करते.

## जागतिक अन्न दिनाचे कोट्स

"आपण हे लक्षात ठेवले पाहिजे की अन्न हे केवळ इंधन नाही; ते एक अनुभव, एक परंपरा आणि संस्कृतींमधील पूल आहे."

"भूक संपवणे म्हणजे फक्त लोकांना अन्न देणे नाही; ते शाश्वत उपाय तयार करण्यासाठी समुदायांना सक्षम बनवण्याबद्दल आहे."

"या जागतिक अन्न दिनानिमित्त, आपण केवळ स्वतःचेच नव्हे तर आपण राहणाऱ्या ग्रहाचेही पोषण करण्यासाठी वचनबद्ध होऊया."

"अन्न सुरक्षा हा एक मूलभूत मानवी हक्क आहे. प्रत्येकाला आवश्यक असलेले पोषण मिळावे यासाठी आपण एकत्र काम केले पाहिजे."



"आपण ज्या पद्धतीने अन्न उत्पादन करतो आणि वापरतो त्याचा आपल्या आरोग्यावर, आपल्या समुदायांवर आणि आपल्या पर्यावरणावर परिणाम होतो. चला असे निर्णय घेऊया जे आपल्या मूल्यांना प्रतिबिंबित करतात."

"कोणीही उपाशी झोपू नये. जागतिक अन्न दिनानिमित्त, आपण सर्वजण मिळून एक असे जग निर्माण करूया जिथे अन्न मुबलक प्रमाणात असेल आणि सर्वांना उपलब्ध असेल."

"एकत्रितपणे, आपण असे भविष्य घडवू शकतो जिथे अन्न हे केवळ काही लोकांसाठी एक विशेषाधिकार नसून प्रत्येकासाठी एक हक्क असेल."

"जगात असे लोक आहेत जे इतके भुकेले आहेत की देव त्यांना भाकरीशिवाय इतर कोणत्याही स्वरूपात दर्शन देऊ शकत नाही."

"भविष्यातील अन्न सुरक्षेसाठी महासागर आणि जलस्रोतांचे रक्षण करा ."

"निरोगी नागरिक ही कोणत्याही देशाची सर्वात मोठी संपत्ती आहे."

पौष्टिक अन्न सेवन केल्याने निरोगी आणि आनंदी जीवन मिळते. चला सर्वांसाठी उपासमारमुक्त भविष्य घडवण्याचा संकल्प करूया.

# किमान वेतन फरकाच्या रक्कमेसाठी कंत्राटी कामगारांचे बेमुदत उपोषण

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "ह" प्रभाग क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागात काम करणारे सफाई कामगार आणि वाहनचालक यांना मार्च 2015 ते नोव्हेंबर 2023 या दरम्यानची सुधारीत किमान वेतनाच्या फरकाची रक्कम व्याजासह अदा करण्यासंदर्भात उचित कार्यवाही करून संबंधित कामगारांना सहकार्य करण्याच्या मागणीसाठी केडीएमसी मुख्यालयाबाहेर श्रमिक जनता संघाचे बेमुदत उपोषण सुरु झाले आहे. शैलेश पगारे, प्रवीण ओव्हळ, सुनील चौधरी, युवराज कांबळे हे कर्मचारी बेमुदत उपोषण करत असून इतर सर्व कंत्राटी कामगारांनी त्यांना पाठींबा दिला आहे.



कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या "ह" प्रभाग क्षेत्रात घनकचरा व्यवस्थापन विभागात काम करणारे सफाई कामगार आणि वाहनचालक यांची मार्च 2015 ते मे 2019 दरम्यानची सुधारीत किमान वेतनाच्या फरकाची थकीत रक्कम अदा करण्याबाबत श्रमिक जनता संघाच्या वतीने याआधी धरणे आंदोलन, एकदिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते. मात्र तरी देखील केडीएमसी प्रशासन याकडे लक्ष देत नसल्याने श्रमिक जनता संघाच्या वतीने बेमुदत उपोषण सुरु करण्यात आले असल्याची माहिती सुनील कंद यांनी दिली.

# सिद्धिविनायक रुग्णालयात अत्याधुनिक टेस्ट ट्यूब बेबी सेंटर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : वंधत्वावरील उपचार कोणत्याही योजनेत नसल्याने गरीब गरजू महिलांना या सुविधेचा लाभ घेता येत नाही. आयव्हीएफ ट्रीटमेंट परवडेल अशा दरामध्ये मिळणे ही ज्यांना मुलं होत नाही अशा महिलांची गरज आहे. कारण वंधत्व हे सांगताही येत नाही आणि त्याचा इलाज कोणत्याही योजनेत समाविष्ट नाही. खर्च खूप येत असल्याने महिलांची आई बनण्याची इच्छा अपूर्ण राहते. म्हणून डॉ. अमोल गीते यांनी चालू केलेले हे टेस्ट टयुब बेबी सेंटर हे अशा महिलांसाठी आशेचा किरण नक्कीच करेल. त्यामुळे सर्वसामान्यांना परवडेल आशा दरामध्ये सुविधा मिळाव्यात आशा भावना सिद्धिविनायक हॉस्पिटल, वर्तकनगर, ठाणे येथे टेस्ट ट्यूब बेबी सेंटरचे उद्घाटनप्रसंगी माजी महापौर मिनाक्षी शिंदे यांनी व्यक्त केल्या. यावेळी ठाणे शहराच्या



माजी महापौर मिनाक्षी शिंदे, राजीव गांधी मेडिकल कॉलेज येथील स्त्रीरोग विभागाच्या माजी विभाग प्रमुख डॉ. जी. व्ही. पराडकर, ठाणे गायनेकोलॉजिकल सोसायटीचे माजी अध्यक्ष डॉ. रजनीश पटेल, छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय कळवा येथील स्त्रीरोग विभाग प्रमुख डॉ. सेनापती, माजी महिला नगरसेविका विमल भोईर, राधा जाधवर, एकता भोईर, जयश्री डेविड, राधिका फाटक, आशाताई डोंगरे, कांचन चिंदरकर, मीनल संखे या कार्यक्रमाला उपस्थित होत्या. राजकीय कार्यक्रमाव्यतिरिक्त एवढ्या मोठ्या प्रमाणामध्ये

## सर्वसामान्यांना परवडेल अशा दरामध्ये सुविधा मिळावी - मीनाक्षी शिंदे

महिला नगरसेवक एकत्र येण्याचा योग खूप कमी वेळा येतो. परंतु डॉ.अमोल गीते गेल्या अनेक वर्षापासून वैद्यकीय क्षेत्रात खूप मोठे काम करत असून सर्वसामान्य ठाणेकरांना परवडेल अशा दरामध्ये आरोग्यसेवा देत आहेत. त्यामुळे सर्व महिला नगरसेवक एका मंचावर आलेल्या आहेत. अशा भावना यावेळी बोलताना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. तसेच अतिशय उत्तम दर्जाची टेस्ट ट्युब सेवा सर्वांना परवडेल अशा दरात देण्याचा मनोदय डॉ. अमोल गीते यांनी याप्रसंगी व्यक्त केला.

याप्रसंगी फर्टीलिटी स्पेशालिस्ट डॉ. पूजा ठक्कर आणि नागेश साकोलकर सह अनेक डॉक्टर मंडळी उपस्थित होते.

# पडघा बाजारपेठेत दिवाळी निमित्त रंगीबेरंगी आकाशकंदील दाखल

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा** : वाढत्या नागरीकरणामुळे चर्चेत असलेल्या व चाळीस खेडी, पाडी, गांवाचें व्यापारी केंद्र असलेल्या पडघा बाजारपेठेत दीवाळीनीमीत्त रगीबेरंगी आकाशकंदील दाखल झाले आहेत.

दोन दिवसांवर आलेल्या दिवाळी सणासाठी ग्रामीण भागातील बाजारपेठा सजु लागल्या असुन तालुक्यातील पडघा बाजारपेठेत मातीच्या पणत्या, रांगोळी, विद्युत रोषणाई, कोनी, रताळी कांरदे, व बच्चे कंपनीने बनवलेल्या किल्ले सजावटीसाठी



लागणारे मातीचे मावळे, विवीध आकाराचे रंगीबेरंगी आकाश कंदील दाखल झाले असुन मागील वर्षी पेक्षा यावर्षी दीवाळीसाठी लागणाऱ्या साहीत्यांचे भाव वधारुनही नागरीक खरेदीसाठी गर्दी करीत आहेत.तर सध्या पडघा परिसरात भातशेती कापणीच्या हंगाम सुरू असुन शेतकरी, शेतमजूर त्यात गुंतलेले असल्याने दिवाळी बाजारपेठेवर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# भिवंडी महानगरपालिका कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड होणार

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : मा. प्रशासक तथा आयुक्त, श्री. अनमोल सागर (भा. प्र.से.) यांनी महानगरपालिकेच्या 4123 कर्मचाऱ्यांची दिवाळी गोड केली आहे. मागील वर्षी तत्कालीन आयुक्तांनी रु. 14,200/- इतके सानुग्रह अनुदान दिले होते. कर्मचारी संघटनांनी आयुक्तांना सानुग्रह अनुदानाकरिता बैठक बोलविण्याची विनंती निवेदनाद्वारे केली होती. कर्मचारी संघटनांची विनंती मान्य करुन आज दिनांक 15.10.2025 रोजी कर्मचारी संघटनेसोबत बैठक पार पडली. या बैठकीमध्ये कर्मचारी संघटनांची विनंती विचारात घेऊन महानगरपालिकेची आर्थिक परिस्थीती बेताची असताना देखील कर्मचाऱ्यांच्या घरात दिवाळीचा सण आनंदाचा होण्यासाठी आयुक्तांनी रु. 14,500/- इतके सानुग्रह अनुदान मंजूर केले. आयुक्तांच्या या निर्णयाने महानगरपालिकेचे कर्मचारी, कर्मचारी संघटनांमध्ये आनंदाचे वातावरण असून सर्वांनी आयुक्तांचे आणि महानगरपालिका प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहेत.

# प्रवीण पाटील यांची किक बॉक्सिंगसाठी राष्ट्रीय पंच म्हणून निवड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : पेण तालुक्यातील शिर्की येथील प्रवीण पाटील यांची आसाम येथे राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धेकरिता राष्टीय पंच म्हणून निवड करण्यात आली आहे. भारतीय किकबॉक्सिंग फेडरेशनच्या विद्यमाने २६ ते ३० ऑक्टोबर २०२५ दरम्यान उत्तर लखीमपूर, आसाम येथे वरिष्ठ, ज्युनियर आणि सब ज्युनियर राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे.

या राष्ट्रीय किकबॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये संपूर्ण भारतातील सुमारे ६०० हून अधिक खेळाडू आणि अधिकारी सहभागी होत आहेत. संघ नोंदणी आणि अहवाल २६ ऑक्टोबर २०२५, राष्ट्रीय उद्घाटन २७ ऑक्टोबर समारोप ३० ऑक्टोबर २०२५ होणार आहे.

प्रवीण ग. पाटील हे पेण तालुक्यातील शिर्की गावचे सुपुत्र असून यांची सलग सात वेळा विविध राज्यात राष्ट्रीय किकबॉक्सिंग स्पर्धांमध्ये राष्ट्रीय पंच म्हणून निवड झालेली आहे. मार्शल आर्ट क्षेत्रात प्रदीर्घ अनुभव असलेले, तसेच एक शिस्तबद्ध कोच व पंच म्हणून त्यांची महाराष्ट्र किकबॉक्सिंग असोसिएशन तसेच भारतीय किकबॉक्सिंग महासंघात त्यांची ओळख आहे. त्यांनी दिल्ली, हरियाणा, कलकत्ता, जम्मू-काश्मीर, चंदीगड, देहरादून, उत्तराखंड येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये एक उत्कृष्ट राष्ट्रीय पंच व निरीक्षक म्हणून काम पाहिले आहे. प्रवीण पाटील हे महाराष्ट्र किकबॉक्सिंग संघाचे अनेक वर्ष हेडकोच म्हणून काम पाहत आहेत. गेली वीस वर्ष ते मार्शल आर्ट या क्षेत्रात काम करीत आहेत. या अगोदर खेळाडू म्हणून त्यांनी जिल्हा, राज्य, राष्ट्रीय पातळीवर खेळून गोल्ड, सिल्वर, ब्रॉन्झ अशी अनेक मेडल जिंकलेले आहेत. दोन वेळा त्यांची इंटरनॅशनल स्पर्धेकरिता भारतीय संघात ऑस्ट्रिया, क्रोशिया येथे निवड झालेली आहे. रायगड भूषण व जीवनगौरव यासारखे पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. खेळाडू नंतर त्यांनी प्रथम कोच व पंच परीक्षा दिल्लीला ए ग्रेडने पास केलेली आहे. तेव्हापासून ते कोच व राष्ट्रीय पंच म्हणून काम पाहत आहेत. 2014 ते 2019 पर्यंत प्रवीण पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र किक बॉक्सिंग संघाने प्रत्येक राष्ट्रीय स्पर्धेत चांगली कामगिरी करून चॅम्पियनशिप जिंकल्या आहेत. महाराष्ट्राचे व त्यांचे नाव मोठे केले आहे. त्यांची महाराष्ट्रासाठी हेड कोचची भूमिका चांगली सर्वांना परिचित आहे. त्यामुळे त्यांची या क्षेत्रात एक वेगळीच ओळख आहे. नंतर त्यांची निवड राष्ट्रीय पंच म्हणून अशा स्पर्धांमध्ये झालेली आहे व त्यांनी त्या स्पर्धांमध्ये चांगली कामगिरी करून आपली छाप उमटवलेली आहे. त्यांच्या या चांगल्या व अष्टपैलू कामगिरीची दखल घेऊन त्यांची आसाम या राज्यात भारतीय किकबॉक्सिंग महासंघाने राष्ट्रीय स्पर्धेकरिता राष्ट्रीय पंच म्हणून निवड केलेली आहे. त्याबाबतचे सिलेक्शन लेटर त्यांना प्राप्त झाला आहे. या निवडीबाबत प्रवीण पाटील यांची या क्षेत्रात अष्टपैलू कामगिरी पाहता क्रीडा क्षेत्रातून सामाजिक राजकीय व विविध क्षेत्रातील मान्यवरांनी प्रवीण पाटील याचे कौतुक व अभिनंदन केले आहे. तसेच या स्पर्धेकरिता महाराष्ट्राचे 30 खेळाडूंचे सिलेक्शन होऊन ते या राष्ट्रीय स्पर्धेत महाराष्ट्राकडून खेळणार आहेत. म्हणून सर्व क्षेत्रातून प्रवीण पाटील व महाराष्ट्र किकबॉक्सिंग संघाला शुभेच्छा दिल्या आहेत.

जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅग्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in






**मेष**
कुटुंबात विशेष लोकांचे आगमन होऊ शकते, आज तुम्ही त्याच्या तयारीत व्यस्त असाल. आज तुम्हाला तुमच्या आयुष्यातील काही मोठा निर्णय घ्याल.

**वृषभ**
आज तुमची नियोजित कामे वेळेवर पूर्ण होताना दिसेल.इलेक्ट्रॉनिक्स व्यापाऱ्यांना लाभाची शक्यता आहे. वैवाहिक जीवनात जवळीक वाढेल.

**मिथुन**
तुमचे आरोग्य सुधारत राहील. आज तुम्हाला तुमचे नियोजित काम पूर्ण करण्यात यश मिळेल. स्थावर मालमत्तेशी संबंधित काम पुढे सरकेल.

**कर्क**
व्यवसायात सुखद बदल होतील. तुमच्या जीवनात पैशाशी संबंधित काही समस्यांमुळे तुम्ही त्रस्त होऊ शकता. जीवनसाथीसोबत वाद होऊ शकतो.

**सिंह**
वैवाहिक जीवनात खूप आनंद असेल. सरकारी विभागातील कर्मचाऱ्यांच्या पगारात वाढ होऊ शकते आणि लवकरच काही चांगली बातमी मिळेल.

**कन्या**
आज संध्याकाळी आपण बाहेर जेवू. मुलांशी परस्पर स्नेह वाढेल. शिक्षकांच्या बदलीच्या अडचणी संपतील, हव्या त्या ठिकाणी बदल्या होतील.

**तूळ**
संपत्तीशी संबंधित कोणताही वाद सोडवला जाऊ शकतो,खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये निष्काळजीपणा आरोग्यासाठी हानिकारक ठरू शकतो.

**वृश्चिक**
तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल खूप आनंदी असेल. तुमच्या मनात आनंद होणार नाही. अध्यात्माद्वारे तुम्ही तुमचे मन शांत ठेवण्याचा प्रयत्न कराल.

**धनु**
मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल.चांगली बातमी मिळेल. संध्याकाळ मुलांसोबत विचार समजून घ्याल.. तुमच्या नात्याची लवकरच पुष्टी होईल.

**मकर**
आर्थिक स्थिती मजबूत होईल.तुमच्या मेहनतीने व्यवसायात प्रगती कराल. आज तुम्हाला चांगली बातमी मिळेल.मित्र तुमचे मनोबल वाढवतील. आज

**कुंभ**
कायदेशीर कामासाठी धावपळ केल्यामुळे थकवा जाणवेल. वैवाहिक जीवनात एकमेकांना समजून घ्यावे लागेल. यामुळे गैरसमज होणार नाहीत.

**मीन**
बोलण्यावर नियंत्रण ठेवा. सुखद क्षण अनुभवाल. नोकरीतील बदलामुळे चांगली प्रगती होण्याची शक्यता आहे.तुम्हाला समाजात मान-सन्मान मिळेल.

नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

# वऱ्हाळा तलाव पाणी प्रदूषण व दुर्गंधी विरोधात आयुक्तांना निवेदन



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी)**

भिवंडी शहरातील वऱ्हाळ तलावात परिसरातील तीन ठिकाणांहून येणारे सांड ड्रेनेजचे पाणी मिसळले जात असल्याने पाणी प्रदूषित होऊनत्यावर हिरवा तवंग आला असुन सदर पाण्याला दुर्गंधी सुटली आहे.त्यामुळे महापालिका प्रशासनाने तातडीने तलावात येणारे सांडपाणी बंद करून तलाव पाण्यास सुटलेली दुर्गंधी बंद करावी अशी मागणी शिवसेनेचे युवा नेते तेजस मनोज काटेकर यांनी केली आहे. स्थानिक ग्रामस्थासोबत त्यांनी महापालिका आयुक्त अनमोल सागर यांची भेट घेऊन लेखी निवेदन सादर केले आहे.तसेच महापालिका प्रशासनाला तलाव दुर्गंधी बंद करता येत नसेल तर तलाव व्यवस्थापनासाठी कामतघर ग्रामस्थांचा हाती सोपवावा अशी मागणीही त्यांनी केली आहे.

भिवंडी शहरातील स्वयंमभू व ऐतिहासिक म्हणून वऱ्हाळ तलाव ओळखला जातो.या तलावातील 5 एमएलडी पाणी शुध्दीकरण व फिल्टर करून जुन्या भिवंडी शहरात राहणाऱ्या नागरिकांना पाणी पुरवठाव्दारे पुरवीले जाते. कामतघर भागात असलेल्या वऱ्हाळ तलावा पासून काही अंतरावर मानसरोवर,फेणेगाव व भाग्यनगर या परिसरातील नागरीवस्तीचे ड्रेनेजचे सांडदूषित पाणी थेट तलावात सोडले जात आहे.त्यामुळे जलप्रदूषण होऊन तलावातील पाण्यास दुर्गंधी सुटली आहे. या तलावातून जुन्या भिवंडी शहरातील प्रभुआळी मंडई,गौरीपाडा,वाणीआळी,ब्राह्मण आळी,सौदागर मोहल्ला, तांडेल मोहल्ला या भागात दररोज पाच एमएलडी पाणी पुरवठा केला जात आहे.केंद्र व राज्य शासनाच्या निर्देशानुसार कोट्यवधींचा खर्च करून या तलावात तीन ठिकाणी विसर्जन घाट बांधण्यात आले आहेत.मात्र सध्या या विसर्जन घाटांची दुरवस्था झाली आहे. तलावातील पाणी विसर्जन घाटातील पाण्यात मिसळू नये व पाणी दुषीत होऊ नये यासाठी तलावात पाणी अडविण्यासाठी उभारण्यात आलेली भिंत तुटली असुन दुरवस्था झाली आहे.

तलाव पाण्यात सांडपाणी मिसळल्याने तलावातील पाणी प्रदूषित होऊन तलावाच्या पाण्यावर हिरवा तेलकट तवंग साचला असुन तलावातील पाण्याला उग्र दर्प दुर्गंधी येत आहे.या दुर्गंधीचा त्रास स्थानिक कामतघर ग्रामस्थांसह तलाव परिसरातून जाणाऱ्या नागरिकांना होत आहे.त्यामुळे ग्रामस्थ तीव्र नाराज झाले असुन त्यांनी स्थानिक शिवसेना युवानेते तेजस मनोज काटेकर यांच्या नेतृत्वाखाली महापालिका आयुक्त अनमोल सागर यांची भेट घेऊन तलावात येणारे सांडपाणी येत्या 15 दिवसात पालिका प्रशासनाने बंद करावे अन्यथा कामतघर ग्रामस्थ स्वतः तलावातील घाण पाणी येणारी ठिकाणे बंद करून हा तलाव कामतघर ग्रामस्थ आपल्या ताब्यात व्यवस्थापनासाठी घेतील असा इशारा तेजस मनोज काटेकर यांनी व ग्रामस्थांनी पालिका प्रशासनाला दिला आहे.

### ■ सांडपाणी गट बंद करणार - आयुक्त

वऱ्हाळ देवी तलावात वाहणारे ड्रेनेजचे पाणी थांबवून त्याचे जल प्रदूषण थांबविण्याचा उपक्रम मनपाच्या पाणीपुरवठा विभाग आणि ड्रेनेज विभागाने संयुक्तपणे सुरू केला आहे.तीन ठिकाणी सांडपाणी अडवून ते नव्या ड्रेनेज लाईन सोबत जोडण्याचे काम हाती घेतले आहे. अशी माहिती आयुक्त अनमोल सागर व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी संदीप पटनावर यांनी दिली. तसेच तलावात आंघोळ करण्यास आणि वाहने धुण्यास मनाई करण्यासाठी तलावातील विसर्जन घाटावर बॅरिकेड्स बसवले जाणार आहेत अशी माहितीपालिका आयुक्त अनमोल सागर यांनी शिष्टमंडळास दिली असुन नागरिकांनी वऱ्हाळ तलावात निर्माल्य,घाण कचरा टाकू नये असे आवाहन संदीप पटनावर यांनी केले आहे.

## शहापूर तालुक्यात आदिवासी विकास महामंडळाकडून
# ७५० शेतकऱ्यांच्या भातखरेदीचे पैसे रखडले

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**किन्हवली :** शहापूर तालुक्यात मागील वर्षी भातखरेदी केल्यानंतर आदिवासी विकास महामंडळाकडून ७५० शेतकऱ्यांचे पैसे अद्याप खात्यात जमा करण्यात आले नाही. त्यामुळे आर्थिक अडचणीत सापडलेला शेतकरी निराश झाला आहे. महामंडळाने व शासनाने तत्काळ याबाबत निर्णय घ्यावा अन्यथा शहापूर तालुक्यात शेतकऱ्यांचे बरं वाईट व्हायला वेळ लागणार नाही. दिवाळी आली तरी पैसे मिळत नसल्याने शेतकरी चिंताचूर झाला आहे. पिकवलेला भात महामंडळाला विकून सुद्धा पैसे मिळत नाही. त्यातच नवीन भात तयार झाला असून तो कधी विकला जाणार याची चिंता सुद्धा शेतकऱ्याला आहे. शहापूर तालुक्यात एकूण सहा खरेदी केंद्रे होती. यात ३६१० शेतकऱ्यांनी भात दिला होता. एकूण ८३ हजार क्विंटल भात खरेदी करण्यात आला होता. मात्र यातील ७५० शेतकऱ्यांचे भाताचे पैसे मिळाले नाहीत. पिकपेरा नसल्याचे कारण देत हे पैसे देण्यात आले नाहीत. भाताचे पैसे बाकी असणाऱ्या शेतकऱ्यांनी आदिवासी विकास महामंडळ, तहसीलदार, जिल्हाधिकारी यांना पत्रव्यवहार केला आहे. मात्र अद्याप कोणतीही कारवाई झालेली नाही.



# भिवंडी उत्तर भारतीय समाज सेवा संस्थेची नवीन कार्यकारणी जाहीर

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी** : भिवंडी शहरात सामाजिक कार्य करणाऱ्या उत्तर भारतीय समाज सेवा संस्थेची नवीन पदाधिकाऱ्याची बैठकीत सर्वानुमते एकमताने बिनविरोध नियुक्ती करण्यात आली असुन अध्यक्षपदावर पुन्हा जेष्ठ पत्रकार कृष्णगोपाल सिंह ठाकूर यांची निवड करण्यात आली आहे.तसेच यावेळी नवीन पदाधिकाऱ्याची नियुक्ती ठाकूर यांनी लगेचच जाहीर केली असुन उपस्थित समाज बांधव मान्यवर नागरिकांनी संस्था अध्यक्ष व पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

पराज्यामध्ये कापड उद्योगाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या भिवंडी शहरात मोठ्या संख्येने उत्तर भारतीय नागरिक राहत असून कामगार व नागरिकांना सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची संधी देण्यासाठी उत्तर भारतीय समाज सेवा संघाचे अध्यक्ष कृष्णगोपाल सिंह ठाकूर यांनी सामाजिक संस्था स्थापन केली असून या संस्थेची विशेष बैठक जनसंपर्क कार्यालयात संपन्न झाली यावेळी नवीन पदाधिकारी यांची कार्यकारिणी जाहीर केली आहे.संस्था कार्याध्यक्षपदी अँड. प्रवीण मिश्रा(पश्चिम विभाग) व मनोज सिंह (पूर्व विभाग) यांची नियुक्ती करण्यात आली असुन रामशंकर केसरवाणी,सदाप्रकाश सिंह,बालमुकुंद शुक्ल यांची मुख्य पदावर तर उदयराज सिंह (कोषाध्यक्ष) जितेंद्र तिवारी,संजय दूबे, पीड़ी यादव, (महासचिव) अजीत सिंह ठाकुर (युवा अध्यक्ष) डॉ. स्वाती सिंह (महिला अध्यक्ष) अँड.आर आर त्रिपाठी (विधी विभाग) गुरुप्रसाद सिंह (प्रवक्ता) पदावर नियुक्ती करण्यात आली असुन या संस्थे मार्फत आरोग्य शिबिर व विविध सामाजिक काम करण्यात येत असून कार्यकर्त्यांनी एक दिलाने काम करावे असे आवाहन यावेळी कृष्णगोपालसिंह ठाकूर यांनी उपस्थित पदाधिकाऱ्यांना बैठकीत केली.

# नवी मुंबई विमानतळाजवळ उभारणार इंडिया पोस्टचा आधुनिक लॉजिस्टिक्स हब

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बातमीदार**

**ठाणे :** देशातील टपाल सेवेमध्ये वेगाने आधुनिकीकरणाची प्रक्रिया आत्मसात करणाऱ्या इंडिया पोस्टच्यावतीने आता लॉजिस्टिक्स क्षमतेत मोठी झेप घेतली आहे. जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी (जेएनपीए) ने नव्याने उद्घाटन झालेल्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या (एनएमआयए) नजीक सुमारे सहा एकर जमिनीचा तुकडा इंडिया पोस्टला देण्यात



आला आहे. या जमिनीवर अत्याधुनिक लॉजिस्टिक्स हब उभारण्यात येणार आहे. नवी मुंबईतील उलवे येथे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आहे. जे दक्षिण मुंबईपासून सुमारे ३७ किमी अंतरावर आहे. देशाच्या प्रगतीत तसेच शहराच्या वाढीत विमानतळे ही मुख्य केंद्र ठरत असतात. यामुळे नवी मुंबई परिसरात निवासी प्रकल्प, औद्योगिक क्षेत्रे, लॉजिस्टिक पार्क, व्यावसायिक केंद्रे, हॉटेल्स आणि इतर सेवांची उभारणी सुरू झाली आहे. दरम्यान जवाहरलाल नेहरू पोर्ट ऑथॉरिटी (जेएनपीए) कडून इंडिया पोस्टला सहा एकर जमिनीवर देण्यात आली आहे. यावर इंडिया पोस्टचे लॉजिस्टिक हब उभे राहणार आहे.

# साडेतीन हजाराच्या वर शेतकऱ्यांचे आठशे पंच्याहत्तर हेक्टर बाधित क्षेत्राचे पंचनामे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मागील महिन्यात झालेल्या अतिवृष्टीमुळे कल्याण तालुक्यातील जवळपास ३ हजार ६६७ शेतकऱ्यांचे ८७५ हेक्टर भात शेतीचे नुकसान झाले होते. या सर्वांचे नुकसान पंचनामे करण्याचे काम नुकतेच झाले असून दिवाळीत बळीराजाला नुकसानभरपाई मिळेल असे आश्वासन कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांनी दिल्याने शेतकऱ्यांची यंदाची दिवाळी गोड होणार असे वाटते.

२८/२९ संप्टेबर रोजी कल्याण तालुक्यात अतिवृष्टी झाली, यामुळे कापणीला आलेल्या भात पिकांचे मोठे नुकसान झाले. जिल्हाधिकारी डॉ श्रीकृष्ण पांचाळ यांनी या नूकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले होते, त्यानुसार कल्याण तहसीलदार सचिन शेजाळ यांच्या मार्गदर्शनाखाली ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी आणि सहाय्यक कृषी अधिकारी यांच्या माध्यमातून हे पंचनामे करण्यासाठी ९१ कर्मचारी नियुक्त करण्यात आले होते. या सर्व कर्मचाऱ्यांनी

### बळीराजाची 'दिवाळी, गोड होणार का?

शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पंचनामे पुर्ण केले असून ते नुकतेच कल्याण तहसीलदार यांना सादर केले असून दिवाळीच्या आत शेतकऱ्यांना त्यांच्या खात्यात नुकसानभरपाई ची रक्कम जमा करण्यात येईल असे आश्वासन सचिन शेजाळ यांनी दिले आहे. त्यामुळे बळीराजाची यंदाची दिवाळी गोड होईल अशी अपेक्षा व्यक्त करुया.

# नांदगावच्या पुर ग्रस्तांना कल्याणातून मदतीचा हात

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : शिव सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य कल्याण विभाग आणि आम्ही सातारकर सामाजिक संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने धाराशिव मधील नादंगाव पूरग्रस्त बळीराजा, विद्यार्थ्यांना, महिलांना मदतीचा हात देत, शैक्षणिक साहित्य, जीवनाआवश्यक वस्तू, महिलांना साड्या आदींची रसद नुकतीच



देण्यात आली.

शिव सह्याद्री प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य कल्याण विभाग आणि आम्ही सातारकर सामाजिक संस्थाची टीम मदत साहित्य घेऊन धाराशिव जिल्ह्यामध्ये परंडा तालुका मधील दुर्गम नांदगाव या गावांमध्ये पोहचले असता पूरपरिस्थिती नंतर गावाचे होत्याचे नव्हते झाले होते. पूर ओसरल्यानंतर शेत जमीनीची झालेली वाताहात आणि शेतकर्याच्या हातातोंडाशी आलेला कापूस, सोयाबीन, भात, ऊस धान, तूर पीक आडवे झाल्याने नैसर्गिक आपत्तीमुळे घास हिरावून घेतला होता. ते पाहून मदतीचा हात देण्यासाठी आलेल्या टीमचे मन अगदी कासावीस झाले. जमा केलेल्या साहित्यांची मदत त्यांच्यापर्यंत पोहोचण्याच काम सर्व पदाधिकारी यांनी आठ दिवस मेहनत करून बाधितां पर्यंत पोहचविले आणि मदतीचा हात दिल्याने पथकातील प्रत्येक सदस्यांला समाधान वाटले असल्याची माहिती शिवसह्याद्री प्रतिष्ठानचे पदाधिकारी सतीश पेडणेकर यांनी दिली.

# जिल्ह्यातील सर्व शाळा स्मार्ट होणार !
## 100 कोटींचा आराखडा तयार करा : खा. श्रीकांत शिंदे यांचे निर्देश

पान १ वरून ▶▶▶

करण्यासाठी पुढाकार घ्यावा. सेल्फ हेल्प ग्रुपच्या माध्यमातून कार्यवाही करावी, असे नमूद केले. शहापूर तालुक्यातील पाणी टंचाई निवारणासाठी ऍक्शन मोडवर कामकाज करण्यात यावे. स्मार्ट सिटी मिशन अंतर्गत कामकाज करताना येणाऱ्या अडचणींवर सविस्तर चर्चा देखील करण्यात आली. २७ गावातील जिल्हा परिषदेच्या १८ शाळा कल्याण डोंबिवली महापालिकेत समायोजन करण्यात आले असून जिल्हा परिषदेच्या या शाळांना स्मार्ट करण्यासाठी आयुक्त अभिनव गोयल यांनी विशेष पुढाकार घ्यावा, अशा सुचना यावेळी देण्यात आल्या. जिल्हा परिषदेच्या १ हजार ३२९ शाळा असुन प्रस्तावित करण्यात आलेल्या सर्व शाळा दुरुस्ती करण्यात आल्या आहेत. जिल्हा परिषदेच्या शाळेत १२ टक्क्यांनी पटसंख्या वाढ झाली आहे. तसेच दिशा प्रकल्पामुळे विद्यार्थ्यांचे अध्ययन स्तर उंचावले आहे. ५७ कोटी ७५ लाख निधी उपलब्ध होता आणि त्याअंतर्गत शाळा दुरुस्ती करण्यात आली असून नाविन्य पुर्ण योजनेचा निधी व जिल्हा वार्षिक सर्वसाधारण योजनेचा निधी देखील शाळा दुरुस्तीसाठी तसेच शाळा स्मार्ट तयार करण्यासाठी १०० कोटींचा निधी आराखडा तयार करण्यासाठी सुचना दिल्या.

जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी जिल्हा प्रशासनासंदर्भातील कामकाज सुरळीत पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून जिल्हा विकास समन्वय व सनियंत्रण समिती (दिशा) सामान्य नागरिकांच्या कल्याणासाठी उद्देश समोर ठेवून कामकाज करण्याबाबत प्रास्तिविकात सांगितले.

यावेळी खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती नरेश गणपत म्हस्के, खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळया मामा - सुरेश गोपीनाथ म्हात्रे, विधानसभा सदस्य डॉ. बालाजी किणीकर, विधानसभा सदस्य कुमार आयलानी, विधानसभा सदस्य राजेश मोरे, विधानसभा सदस्य सुलभा गणपत गायकवाड, आयुक्त नवीमुंबई महानगरपालिका डॉ. कैलास शिंदे, आयुक्त कल्याण डोंबिवली महानगरपालिका अभिनव गोयल, आयुक्त उल्हासनगर महानगरपालिका मनिषा आव्हाळे, पोलीस अधीक्षक ठाणे (ग्रामीण) डॉ. डी. एस. स्वामी, आयुक्त भिवंडी निजामपूर महानगरपालिका अनमोल सागर, अतिरिक्त आयुक्त ठाणे महानगरपालिका संदिप माळवी, पोलिस उपायुक्त ठाणे शहर श्रीकांत पाठक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) अविनाश फडतरे तसेच संबंधित सर्व अधिकारी व कर्मचारी आदी उपस्थित होते.

या बैठकीत पंतप्रधान आवास योजना शहरी (PMAY-U), स्वच्छ भारत मिशन (SBM), स्मार्ट सिटी मिशन, अमृत योजना, सर्व शिक्षा अभियान (SSA), मिड-डे मील स्कीम, एकात्मिक ऊर्जा विकास योजना, दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण ज्योती योजना, आदर्श ग्राम योजना, जल जीवन मिशन या अंतर्गत येणाऱ्या विविध योजनांच्या अंमलबजावणी आणि संचालनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती नरेश गणपत म्हस्के यांनी दिशा समिती मार्फत जलद गतीने कामकाज पुर्ण करण्यासाठी सुचना दिल्या आणि केंद्र शासनाच्या योजना यशस्वीपणे राबवण्यासाठी पुढाकार घ्यावा. तसेच पंतप्रधान आवास योजना शहरी भागात राबविण्यासाठी ठाणे महापालिकेने विशेष प्रयत्न करण्यात यावे, असे मार्गदर्शन केले.ग्रामीण भागाच्या विकासासाठी दिशा समिती काम करत असते आणि यासाठी दिशा समितीमार्फत नियंत्रण असणे गरजेचे आहे. जल जीवन मिशन योजना, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण विभागातील कामकाज वेगाने होण्यासाठी पाठपुरावा करून कामकाज सुरळीत होण्यासाठी प्रयत्न करावे, असे आवाहन खासदार तथा सह अध्यक्ष दिशा समिती बाळया मामा- सुरेश गोपीनाथ म्हात्रे यांनी केले.






# सुभेदारवाड्याच्या सी.एम.पुराणिक शाळेत 'वाचन प्रेरणा दिन' साजरा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वार्ताहर**

**कल्याण** : ज.ए.इ.ची सी.एम. पुराणिक सुभेदार वाडा प्राथमिक शाळेत आज दि. १५ ऑक्टोंबर २०१५ रोजी भारतरत्न डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या जन्मदिना-निमित्त 'वाचन प्रेरणा दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कल्पना पोतदार, इंग्रजी माध्यमाच्या मुख्याध्यापिका पूनम वडनेरे, सुभेदारवाडा हायस्कूलचे पर्यवेक्षक होडगर सर , शाळेच्या पर्यवेक्षिका स्मिता फिरके तसेच पालक शिक्षक संघाच्या उपाध्यक्षा सौ. टावरे आणि उपकार्यवाह श्रीमती दळवी यांच्या हस्ते डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आला.

भारतचे माजी राष्ट्रपती आणि शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जी अब्दुल कलाम यांचा जन्मदिवस म्हणजेच १५ ऑक्टोबर. त्यांच्या कार्यकर्तृत्वाने, विचारांनी आणि ज्ञानप्रेमाने अनेक तरुणांना प्रेरणा दिली. त्यांनी आयुष्यभर वाचनाला महत्व दिलं आणि वाचनाच्या माध्यमातून समाजात सकारात्मक बदल घडवण्याचा संदेश दिला. त्यांच्या स्मरणार्थ, वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी आणि वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी हा दिवस वाचन प्रेरणा दिन म्हणून पाळला जातो.

> वाचन प्रेरणा दिनानिमित्ते शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पोतदार यांनी विद्यार्थ्यांना 'वाचाल तर वाचाल' अस उदबोधन करून वाचन ही ज्ञान मिळवण्याची पहिली पायरी आहे. वाचनाच्या सवयीमुळे व्यक्तीमत्व विकास, भाषिक समृद्धी आणि विचारांची स्पष्टता येते. डॉ. ए. पी. जी अब्दुल कलाम हे स्वतः उत्तम वाचक होते. त्यांचे बालपण गरिबीत गेले, पण वाचनाच्या सवयीमुळे ते भारतचे सर्वोच्च शास्त्रज्ञ आणि राष्ट्रपती बनले...अशा शब्दांत विद्यार्थ्यांना संबोधित केले.

या निमित्ताने शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना पोतदार यांनी विद्यार्थ्यांना 'वाचाल तर वाचाल' अस उदबोधन करून एका गरीब कुटुंबातून जन्माला आलेले अब्दुल कलाम निश्चितच युवकांसाठी प्रेरणास्त्रोत आहे. त्यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान पाहून जन्म हा वाचन प्रेरणा दिन व जागतिक विद्यार्थी दिन म्हणून साजरा करण्यात येतो. त्यांच्या जीवनकार्याची आठवण म्हणून शाळा अन महाविद्यालयामध्ये वाचन प्रेरणा दिन कार्यक्रमाचे आयोजन व या दिनचे महत्व पटवून दिले. तसेच वाचनातून ज्ञान संवर्धन होउन समज व आकलन क्षमता वाढते, भाषा कौशल्य व संभाषण कौशल्य विकसित होतात. ताण तणाव कमी करायचा असेल तो रोज एका पुस्तकाचे वाचन करणे आवश्यक आहे त्यामुळे एकंदरीत व्यक्तिमत्व विकास होतो असा संदेश या कार्यक्रमांमध्ये दिला. या उपरांत सर्व वर्गशिक्षकांनी

देखील विद्यार्थ्यांना वर्गामध्ये वाचनाचे महत्त्व पटवून दिले आणि विदयार्थ्यांसमवेत स्वतः ही पुस्तकाचे वाचन केले.

# महावितरणच्या दोघांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुबई** : अल्पवयीन तरुणाच्या मृत्यूस जबाबदार धरून भाडुप पोलिसानी महावितरणचे सहाय्यक अभियता संतोष रुद्रशेट्टी यांच्यासह दोघांविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल केला आहे.

साचलेल्या पाण्यात विद्युत प्रवाह उतरून विजेचा धक्का बसत असल्याच्या तक्रारी स्थानिक दुकानदार आणि रहिवाशांनी महावितरण कंपनीकडे केल्या होत्या. त्यावर तब्बल तीन तास काहीच हालचाल न झाल्याने १९ ऑगस्टला साचलेल्या पाण्यातून पायी जाणाऱ्या १७ वर्षीय दीपक पिल्ले यास विजेचा धक्का बसून त्याचा मृत्यू झाला. याप्रकरणी भांडुप पोलिसांनी अपघाती मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला. तपासात घटनास्थळी लघुदाब भूमिगत केबलमधील बिघाडामुळे पाण्यात वीजप्रवाह उतरल्याचे स्पष्ट झाले. याबाबतची जबाबदारी सहाय्यक अभियंता रुद्रशेट्टी आणि जनमित्र (तांत्रिक कर्मचारी) विकास जाधव यांची होती; मात्र ही जोडणी सदोष असल्याने भूमिगत केबलमध्ये बिघाड उद्भवला. तक्रारी या दोघांकडे पाठविल्या होत्या, असे महावितरणच्या नोंदींतून स्पष्ट झाले. या तपासाच्या आधारे रुद्रशेट्टी, जाधव यांनी कर्तव्य अचूकरीत्या न बजावल्याने दीपकचा मृत्यू झाल्याचा ठपका ठेवून सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.

## महिला विकास प्रतिष्ठान सामाजिक संस्थेच्या वतीने
# गरजू विद्यार्थ्यांना दिवाळी फराळाचे वाटप




### महिला प्रतिष्ठानचा स्तुत्य उपक्रम

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**पेण** : नवी मुंबई येथील 'महिला विकास प्रतिष्ठान सामाजिक संस्थेच्या वतीने आणि खालापूर तालुक्यातील पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते दिनकर भुजबळ यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाच्या दीपावलीच्या पार्श्वभूमीवर एका स्तुत्य उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. संस्थेच्या 'दीपावली आनंदोत्सव'या कार्यक्रमांतर्गत रायगड जिल्ह्यातील दुर्गम भागातील तळाशी शाळेतील गरजू मुलांना ब्लँकेट व फळवाटप कार्यक्रम' १४ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आला.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे, संस्थेने 'तुमच्या सहकार्याने उजळेल एक दिवा मनमनात' असे भावनिक आवाहन केले आहे. म्हणजेच, समाजातील दानशूर व्यक्तींच्या मदतीने दुर्गम भागातील गरजू कुटुंबांना थंडीत उब देणारे ब्लँकेट आणि पौष्टिक फळे देऊन दिवाळीचा आनंद त्यांच्यापर्यंत पोहोचवण्याचा संस्थेचा मानस आहे.

गरजू बांधवांना मदतीचा हात देणाऱ्या या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे पदाधिकारी सक्रिय आहेत. यामध्ये अध्यक्षा सौ. सत्वशीला जगन्नाथ नलवडे, सचिव सौ.वंदनाआनंद साळवी आणि खजिनदार सौ. कुंजली सुरेश पवार हे विशेष परिश्रम घेत आहेत. महिला विकास प्रतिष्ठान फार्म (रजि.), नवी मुंबई, ही संस्था दरवर्षी अशा विविध सामाजिक उपक्रमांतून वंचित घटकांना मदत करत असते. या दीपावली आनंदोत्सवामुळे दुर्गम भागातील अनेक मुलांच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे कार्य केले आहे. या कार्यक्रमास शिरवली ग्रामपंचायतीचे सरपंच,महेश पाटील,ग्रामविकास अधिकारी अंकुश पाटील,ग्रामपंचायत सदस्य स्वप्नील जाधव,ग्रामस्थ दत्तात्रय झोरे,गंगाराम झोरे,श्वेता जाधव,पत्रकार हणमंत मोरे शाळेचे मुख्याध्यापक हणमंत गाडे,शिक्षक संदीप जाधव आदी उपस्थित होते.

# शिवसेना शहर प्रमुखांकडुन अंबरनाथच्या कुटुंबियांना 10 रुपयांत दिवाळी शिधा



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ** : दिवाळी सण उत्साहाचा आनंदाचा आणि वर्षातून एकदा गोडधोड करून खाण्याचा. गोरगरिबांच्या घरची दिवाळी अधिक गोड व्हावी, यासाठी शिवसेना (शिंदे गट) शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या संकल्पनेतून दरवर्षी हा फराळाचा शिधा वाटप कार्यक्रम आयोजित करण्यात येतो.

जो शिधा बाजारभावाने ६०० रुपये किमतीचा आहे , तो केवळ फक्त १० रुपयांत उपलब्ध करून दिला जातो. बुधवारी शिव सेना मध्यवर्ती शाखा येथे आयोजित या कार्यक्रमात ४,००० कुटुंबानी शिस्तबध्द रांगेत लाभ घेतला.

अंबरनाथ शहरात गरीब आणि त्यांच्या मुलांनाही दिवाळीचे चविष्ट फराळ घरी बनवता यावेत, यासाठी शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या पुढाकाराने अन्नपदार्थ किटचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत फक्त १० रुपयांत नाममात्र दरात दिवाळीसाठी आवश्यक असलेले सर्व शिधा उपलब्ध करून देण्यात आले.

शिवसेना शहरप्रमुख अरविंद वाळेकर यांच्या मार्गदर्शनाखाली, या आधी ही ४० वर्षांपासून पश्चिम खुंटवली व शिवसेना शाखा मध्यवर्ती शाखेत परिसरातील भवानी चौकात शहरातील रहिवाशांसाठी विविध सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. याच परंपरेनुसार या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.. या किटमध्ये प्रत्येकी एक किलो रवा (बारीक), मैदा, साखर, चपटा भात, अर्धा किलो मसूर, तेलाचे पॅकेट, २५० ग्रॅम शेंगदाणे, १०० ग्रॅम मसूर आणि चिवडा मसाला यांचा समावेश होता. यामुळे या उपक्रमाला किती मोठा प्रतिसाद मिळाला हे दिसून येते.

अंबरनाथ शहर शिवसेना प्रमुख अरविंद वाळेकर यांनी आपली भावना व्यक्त केली. ते म्हणाले, " गरिबांच्या चेहऱ्यावरील आनंद हा आपल्या शिवसैनिकांसाठी अभिमानाचा आणि आनंदाचा क्षण आहे."

या कार्यक्रमाला माजी नगरपरिषद अध्यक्षा मनीषा वाळेकर, माजी नगरपरिषद उपाध्यक्ष राजेंद्र वाळेकर, युवासेना जिल्हा अधिकारी अ‍ॅडव्होकेट निखिल वाळेकर, प्रकाश डावरे, दीपक पवार, भूषण वाळेकर, राजू शिर्के, अरविंद मालुसरे इत्यादी मान्यवर देखील उपस्थित होते. या प्रतिसादाकरिता वाळेकर परिवाराने अंबरनाथकरांचे आभार मानले.

# मंजूदेवी लोढा वाचनालयाचे उद्घाटन

## राष्ट्राचा उत्तम नागरिक घडवण्यासाठी पुस्तकांचे वाचन आवश्यक - अनिल फड

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : लोकभूमी प्रतिष्ठान या सामाजिक संस्थेतर्फे श्रीमती मंजुदेवी लोढा वाचनालय, ग्रंथालय, डिजिटल लायब्ररी व विद्यार्थी अभ्यासिका यांचे उद्घाटन नुकतेच संपन्न झाले. लोकभूमी प्रतिष्ठान या संस्थेचे संस्थापक अध्यक्ष राहुल परदेशी यांनी परिसरातील वाचकांसाठी वाचनालय उघडण्याचा निर्धार केला होता. त्यानुसार कल्याण मधील लोढा गार्डन सोसायटीच्या रजनीगंधा इमारतीमध्ये उपलब्ध असलेल्या जागेत वाचनालय उघडण्याचे त्यांनी ठरविले आणि त्यास लोढा गार्डन सोसायटीच्या कमिटीने सहकार्याचे आश्वासन दिले. त्यानुसार या जागेत राहुल परदेशी यांनी पुस्तके, खुर्च्या, फर्निचर, लॅपटॉप यांची व्यवस्था केली. विमुक्त घुमंतू जनजाती विकास परिषदेचे राष्ट्रीय कार्यवाह अनिल फड यांच्या हस्ते वाचनालयाचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून ठाणे जिल्हा सहकारी बोर्डाचे संचालक कैलास पाटील, ठाणे जिल्हा सहकार



विकास अधिकारी तानाजी पानसकर, अखिल भारतीय शिक्षक साहित्य कला क्रीडा मंडळाचे अध्यक्ष नटराज मोरे, खान्देश हित संग्रामचे अध्यक्ष विजय पाटील हे उपस्थित होते. लोढा गार्डन सोसायटीचे राजेश सिंग, सुनील कोळी, शिवशंकर गुप्ता, अमित खांडगे यांच्या हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा सहकार विकास अधिकारी तानाजी पानसकर यांनी वाचनामुळे जीवनात होणाऱ्या बदलांची माहिती देऊन जास्तीत जास्त लोकांनी वाचन केले पाहिजे असे आवाहन करून डिजिटल साहित्याच्या अतिवापरामुळे होणाऱ्या धोक्यांची माहिती दिली. उद्घाटक अनिल फड यांनी चांगला उपक्रम सुरू केल्याबद्दल राहुल परदेशी यांचे कौतुक केले. पुस्तकांमुळे माणसाची ज्ञानाची भूक भागते, पुस्तकांमुळे चांगले विचार अनेक लोकांपर्यंत पोहोचतात, पुस्तके ही राष्ट्राचा उत्तम नागरिक घडवण्यासाठी आवश्यक असलेली बाब आहे. पुस्तकांचे वाचन केल्यास आपल्या जीवनात परिवर्तन घडवून येऊ शकते त्यामुळे प्रत्येक व्यक्तीने पुस्तकांचे वाचन करून त्यातील ज्ञानाचा उपयोग आपल्या जीवनात केला पाहिजे. सोसायटीच्या जास्तीत जास्त लोकांनी सदर वाचनालयाचा उपयोग करून घेतला पाहिजे असे आवाहन फड यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरेश परदेशी यांनी केले तर आभार दिनेश परदेशी यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रमाशंकर बिंद, नरेंद्र बहादूर सिंग, पप्पू पाटील यांनी परिश्रम घेतले.

# ज्येष्ठ राष्ट्रसेविका सुमन रिसबुड यांचे निधन



दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण** : कल्याण मधील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या सुमन रीसबूड यांचे वयाच्या 94 व्या वर्षी वृद्धापकाळाने कल्याण येथे बुधवारी 15 ऑक्टोबर रोजी पहाटे राहत्या घरी दुःखद निधन झाले. कल्याण मध्ये 1940 साली राष्ट्रसेविका समितीची शाखा सुरू झाली तेव्हापासून त्या राष्ट्रसेविका होत्या. त्यांनी अनेक वर्ष गीत प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. अनेक पद्य त्यांची तोंडपाठ होती. त्या उज्वला मंडळाच्या संस्थापक सदस्य होत्या. मंडळाने 2010 व 11 साली सुभेदार वाडा गणेशोत्सवाच्या व्यवस्थापनाची जबाबदारी घेतली होती. कल्याणच्या स्त्री शिक्षण मंडळ मध्ये त्या कार्यरत होत्या.

# गोवेलीमध्ये जीवनदीप महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**गोवेली** : दरवर्षी १५ ऑक्टोबर रोजी भारताचे माजी राष्ट्रपती, महान वैज्ञानिक आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. या दिनाचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे समाजात वाचनाची आवड निर्माण करणे व वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देणे होय. या निमित्ताने देशभरातील शाळा, महाविद्यालये, वाचनालये तसेच विविध शासकीय संस्था वाचनविषयक उपक्रम, पुस्तक प्रदर्शन, वाचन स्पर्धा व प्रबोधन कार्यक्रमांचे आयोजन करतात, ज्याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानप्रेम आणि वाचनाची सवय वाढीस लागते.



डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचा जन्म १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडू राज्यातील रामेश्वरम् येथे झाला. त्यांनी अत्यंत साध्या परिस्थितीत शिक्षण घेऊन विज्ञान क्षेत्रात उल्लेखनीय योगदान दिले. भारताच्या क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचे नेतृत्व करून त्यांनी "मिसाईल मॅन" ही उपाधी प्राप्त केली. डॉ. कलाम यांचे विचार होते की, "वाचन हे माणसाच्या विचारशक्तीला पंख देते आणि एक चांगले पुस्तक म्हणजे हजार मित्रांसारखे असते." त्यांनी "विंग्ज ऑफ फायर" आणि "इंडिया २०२०" यांसारख्या ग्रंथांद्वारे युवकांना मोठी स्वप्ने पाहण्याची आणि ती पूर्ण करण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या जन्मदिनी साजरा होणारा वाचन प्रेरणा दिन प्रत्येक नागरिकाला वाचनाची सवय लावून ज्ञानवृद्धीकडे वाटचाल करण्याचा संदेश देतो.

या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२५ रोजी जीवनदीप ग्रंथालयात वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शन सोहळा आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमास जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. रवींद्र घोडविंदे, संचालक श्री. प्रशांत घोडविंदे, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाघ, विधी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जयकुमार रिजवानी, उपप्राचार्य प्रा. हरेंद्र सोष्टे, तसेच निर्मल इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या सौ. भावना कुंभार, सर्व विभागांचे प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मयोगी आणि विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांनी वाचन संस्कृती जोपासण्याचे आणि वाचनाची सवय ही वैयक्तिक तसेच सामाजिक विकासाचे मूळ असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना ग्रंथपाल श्री. राजाराम कापडी यांनी म्हटले की, "संस्कृतीचा वारसा जतन करणारी ग्रंथालय ही सामाजिक संस्था असून वाचनामुळे व्यक्तिमत्व घडते आणि जीवन समृद्ध होते."

या कार्यक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना वाचनाची प्रेरणा देत ज्ञानार्जन आणि वाचनसंवर्धनाचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमाचे सुयोजन जीवनदीप ग्रंथालयाच्या वतीने करण्यात आले.

# मुरबाड पंचायत समितीमध्ये दिवाळी फराळ महोत्सव

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : महाराष्ट्र शासन ग्रामविकास व पंचायतराज विभाग उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जिवनौन्नती अभियान ठाणे तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष मुरबाड यांच्या वतीने पंचायत समिती मुरबाड येथे 15 ते 17 आंक्टोबर फराळ महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये प्रभाग संघ कुडवली ग्रामसंघ मातोश्री यांच्या समर्थ कृपा बचत गटाच्या महिलांनी तयार केलेले करंजी, चकल्या, चिवडा, शंकरपाळी, चकलीचे पीठ,



त्याच बरोबर स्वामिनी ग्रामसंघ आंबेळे कडून पणत्या, रांगोळी, कटलरी सामान, मातीचे पुतळे यांचे स्टाल लावण्यात आले होते. यावेळी वनिता घोरड यांच्या पुढाकाराने याचे नियोजन करण्यात आले असून यावेळी सुवर्णा गायकर, सारीका डोहळे, स्वाती शेळके उपस्थित होत्या. हे सर्व फराळ अत्यंत चविष्ट व रूचकर तसेच माफक दरात उपलब्ध असल्याने नागरिकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन वनिता घोरड यांनी केले आहे.

# नविन पे बिल प्रक्रियेमुळे शिक्षकांच्या वेतनास विलंब होणार

## दिवाळीनंतर प्रक्रिया राबवण्याची अनिल बोरनारे यांची मागणी

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई** : शालार्थ' प्रणालीमध्ये 'संचमान्यता' प्रणालीशी जोडलेल्या नवीन पे-बिल प्रक्रियेमुळे दिवाळीपूर्वी होणाऱ्या वेतनात अडथळे येण्याची शक्यता असल्याने, सदर प्रक्रिया दिवाळीनंतर लागू करण्याची मागणी भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी निमंत्रित सदस्य व मुंबई मुख्याध्यापक संघटने उत्तर विभागाचे अध्यक्ष अनिल बोरनारे यांनी केली आहे

याबाबत अनिल बोरनारे यांनी शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांना निवेदन पाठवून ही मागणी केली आहे

शालेय शिक्षण विभागामार्फत 'शालार्थ' प्रणालीमध्ये पे-बिल पुढे पाठवण्यासाठी 'संचमान्यता' प्रणालीशी जोडलेली नवीन प्रक्रिया अलीकडेच लागू करण्यात आली आहे. या प्रक्रियेनुसार, पे-बिल पुढील स्तरावर पाठवताना प्रणाली आपोआप 'संचमान्यता' मधील मंजूर पदे आणि पे-बिलमधील कर्मचाऱ्यांची संख्या तपासत आहे. जर पदांची संख्या जुळली नाही तर बिल थांबते व शिक्षण अधिकारी कार्यालयाकडे विशेष मंजुरीसाठी पाठवावे लागते. शालार्थाच्या अशा प्रक्रियेमुळे राज्यातील अनेक शाळांचे वेतन देयके अडकले असून, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या दिवाळीपूर्वी वेतन होईल की नाही यात शंका निर्माण झाली आहे

शिक्षकांचे वेतन दिवाळीपूर्वी व्हावे यासाठी ही प्रक्रिया तातडीने स्थगित करून दिवाळीपूर्वी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन जुन्या पद्धतीनुसार तात्काळ अदा करण्यात यावे अशी मागणी अनिल बोरनारे यांनी केली आहे

# ठाणे महापालिकेस मिळाला 'हरित यशोगाथा सन्मान'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका क्षेत्रातील हवेची गुणवत्ता चांगली राहावी, यासाठी राष्ट्रीय स्वच्छ हवा प्रकल्पाअंतर्गत महापालिका करीत असलेल्या प्रयत्नांचा गौरव 'आयफॅट इंडिया २०२५' या कार्यक्रमात 'हरित यशोगाथा सन्माना'ने करण्यात आला. 'वायू' या संकल्पनेवर, दहा लाखांपेक्षा जास्त लोकसंख्या असलेल्या वर्गवारीत, ठाणे महापालिकेस गौरविण्यात आले आहे.

महाराष्ट्र सरकारच्या पर्यावरण आणि हवामान बदल विभागामार्फत, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई आणि युनिसेफ, महाराष्ट्र यांच्या सहकार्यातून आयफॅट इंडिया २०२५ या कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षमता वृद्धीसाठी, नवीन उपक्रमांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि हवामान कृतींबाबत स्थानिक आवश्यकता निश्चित करण्यासाठी 'माझी वसुंधरा अभियाना'त गुरूवार, १४ ऑक्टोबर रोजी 'आयफॅट इंडिया २०२५'चे मुंबईत




आयोजन करण्यात आले.

राष्ट्रीय स्तरावरील या व्यासपीठावर, 'महाराष्ट्राच्या स्थानिक स्वराज्य संस्थामधील हवामानाची स्थिती' या विषयावरील कार्यक्रमात ठाणे महानगरपालिकेस 'हरित यशोगाथा सन्मान-२०२५' देऊन सन्मानित करण्यात आले. ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरभ राव यांच्या वतीने हा सन्मान उपायुक्त (पर्यावरण) मधुकर बोडके, मुख्य पर्यावरण अधिकारी मनीषा प्रधान, उप पर्यावरण अधिकारी विद्या सावंत यांनी स्वीकारला.

ठाणे महानगरपालिकेने राष्ट्रीय स्वच्छ हवा प्रकल्पात हवा गुणवत्ता सुधारण्यासाठी विविध उपक्रम हाती घेतले आहेत. त्यात, १२३ ई बसेस खरेदी करण्यात आली आहे. आणखी १६० इबसगाड्यांची निविदा अंतिम टप्प्यात आहे. तसेच, उपमुख्यमंत्री हरित ठाणे योजनेअंतर्गत ठाणे महापालिका क्षेत्रात दोन लाखापर्यंत वृक्ष लागवड करण्यात आली आहे. त्यात, मियावाकी वृक्ष लागवडीचा समावेश आहे. ठाण्यातील बांधकामस्थळी नियमितपणे धुळ नियंत्रणाची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच, मोठ्या रस्त्यांच्या सफाईसाठी यांत्रिक सफाईची पद्धतही वापरली जात आहे. धूळ प्रदूषण नियंत्रणाबाबत विविध स्तरांवर जनजागृती करण्यात येत असून ठाण्यातील हवेच्या गुणवत्तेत लक्षणीय सुधारणा झाली असल्याची नोंद या सन्मानासाठी घेण्यात आली आहे.







Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com * RNI NO : MAHMAR/2016/72091 * Postal Reg. No. THC/256/2022-2024